# ई साहित्य प्रतिष्ठान

## बालनेटाक्षरी प्रस्तुत

# धम्म धमाका

ई दिवाळी अंक २०१४



संपादिका : अनघा हिरे (नाशिक)

मुखपृष्ठ /सजावट : अनघा हिरे

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

9869674820

E mail : balnetakshari@gmail.com

9422284116

©2013 : ई साहित्य प्रतिष्ठान

सर्व बालमित्रांना दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा

काही गडबड नको , गोंधळ नको आज हवी आहे फक्त  फक्त मजाच हो ना !

म्हणून तर मागच्या वर्षाप्रमाणे आम्ही ह्या वर्षी पण तुमच्यासाठी आणला आहे      दिवाळी अंकाचा खजिना !

मग आहात ना तयार हा खजिना उघडून बघण्यास ?

चला तर मग वेळ कशाला वाया  घालवता उघडा तुमचा खजिना आणि लुटा   आनंद .  आपल्या आनंदात इतरांनाही सामील करून घ्या आणि नेहेमी प्रमाणेच आम्हाला

तुमचे छान छान ई मेल पाठवा बर का ! दिवाळीत तुम्ही काय मजा केली हे  पण आम्हाला कळवा.

अनघा हिरे



# अंतरंग


**कविता**

आली दिवाळी, आली दिवाळी
उपेंद्र चिंचोरे
शुभ दिपावली... मंगेश मेढी
एक "दे" बोलगाणे... कविता नवरे
मामाचा गाव ... उद्धव भयवाळ
हत्ती... उद्धव भयवाळ
बालहट्ट श्रीरामाचा.. रजनी अरणकल्ले
विडंबन काव्य... मंगेश....!
बाळासाठी.......बसवराज बिराजदार
पोपटराव पोपटराव... बसवराज बिराजदार
चांदोबाची गमाडी - गम्मत !...
बसवराज बिराजदार
वाघाची मावशी....बसवराज बिराजदार

**छोट्यांच्या लेखणीतून**

वारली चित्रकला श्रावणी मिलिंद मेढी इथे झाला बॉम्ब स्फोट ...
तनया देवळे

**कथा**

बनीची गोष्ट... कविता नवरे
पाहुणचार..!! रजनी अरणकल्ले
एक बोध कथा (संग्रहित)
गणपती बाप्पा more द्या

**हसवा फसवी..** रजनी अरणकल्ले

आली दिवाळी, आली दिवाळी,
मौज मजेची दिवाळी ....... ।।ध्रु ॥

पान-फुलांचे बांधू तोरण,
रांगोळ्यांनी सजेल अंगण,
प्रकाशणा-या पणत्यांनी,
उजळे घर हे सायंकाळी,
आली दिवाळी, आली दिवाळी ।।१॥

झिरमळ्यांचा आकाशकंदील,
उंच फांदीला, दादा बांधील,
भुईनळ्यांची आतिषबाजी,
अहा ! खुले अंतराळी,
आली दिवाळी, आली दिवाळी ।।२॥

किल्ला करू या, गड शिवनेरी,
शिवरायांचे चित्र त्यावरी,
गुहेमधुनी, सिंह गर्जना,
अन् वाघाची डरकाळी,
आली दिवाळी, आली दिवाळी ।।३॥

छान छान कपडे, नव्याने नटणे,
लवकर उठणे, सुगंधी उटणे,
कुडकुडणा-या थंडीमध्ये,
करू पहाटे आंघोळी,
आली दिवाळी, आली दिवाळी ।।४॥

नको नको ती पोळी-भाजी,
फराळ खाऊ, लाडू, करंजी,
शेव, चिवडा, चकली, चिरोटे,
कडबोळी अन् शंकरपाळी,
आली दिवाळी, आली दिवाळी ।।५॥

©गीतकार : उपेंद्र
चिंचोरे
chinchoreupendra@yahoo.com



शुभ दिपावली
हर्ष विजयाचा सण विजयाचा
असत्यावरी सत्याचा
अधर्मावरी धर्माचा
असुरांवरी प्रभु पुरुषोत्तमाचा
तव सर्वांसी तव सर्वांसी
शुभ दिपावली शुभ दिपावली
सुदीन हे सौख्य भरे
स्वास्थ भरे संपन्न से
जननी जानकी माता
निज गृहे आगमन हे आगमन
हे
तव सर्वांसी तव सर्वांसी
शुभ दिपावली शुभ दिपावली
तिमीर छेदती तेजो तिर
मोह जाळती आत्म ज्योती
ज्योती ज्योती तेवूनीया
स्वागत करुया स्वागत करुया
तव सर्वांसी तव सर्वांसी
शुभ दिपावली शुभ दिपावली
मंगल प्रहरी स्मरण करता
सोडवी श्रीहरी नरकवास
सुटले बंध संपल्या यातना
लाभले सुख सौभाग्य धन
तव सर्वांसी तव सर्वांसी
शुभ दिपावली शुभ दिपावली
लेप प्रितीचा अभ्यंग अर्पूनी
न्हाऊ घालुनी सजविते
भाग्य ज्योती घेऊन करी
पूजीते लक्ष्मी नारायणा
तव सर्वांसी तव सर्वांसी
शुभ दिपावली शुभ दिपावली
सरले साल सरल्या प्रतीक्षा
आनंदास उधाण येइ
भेटीस जेंव्हा भाऊ जाइ
ओवाळीते ती प्रेमभरे प्रेमभरे
तव सर्वांसी तव सर्वांसी
शुभ दिपावली शुभ दिपावली
------------------------------------

मंगेश मेढी
९८८१४९०१४७
www.mangeshmedhi.blogspot.in

# हसवा फसवी..

`गोलमटोल शेटजी, दुपारचे जेवत नाहीत, अशी तक्रार घेऊन गोलमटोल शेठाणी डॉक्टर कडे गेल्या. डॉक्टरने सकाळपासूनची त्यांची दिनचर्या जाणुन घेतली. सकाळी ऊठल्यावर ७ वा. एक ग्लास बदामाचे दूध, तासाने गव्हाची लापशी एक वाडगे भरून, तासाभराने नाश्त्याला एक डाव तुपातले २ पराठे दही लोणचे ढोकळा पापडी व एक मोठा ग्लास ताज्या फळांचा रस. मग दुकानात गेल्यावर



११ वा. एक मोठा मग भरून अस्सल दुधाचा चहा त्या बरोबर मठरी मुठिया. १ वाजता

जेवणाची वेळ असते. अजुन एक तास जेवायला असतो. शेटजी खूप मेहनत घेऊन आपले काम चोख करीत असतात. त्यांच्य तब्बेतीची काळजी घ्यावी लागते. म्हणून १२वा. दोन ताजी फळे बारीक चिरून त्यात सुका मेवा घालून त्यांना देते. ते वेळेचे धनी आहेत सगळं वेळेवर झाले पाहिजे. म्हणुन बरोब्बर १ वाजता त्यांचा जेवणाचा डबा भरून देते. त्यात चार फुलके भाजी डाळ भात आणी एक रस्सा भाजी तोंडी लावायला चटणी..फक्त एवढाच पाठवते! सगळा डबा परत येतो फक्त एक फुलका आणी घासभर भात जेवतात..! का..?.. तर भुकच नाही म्हणतात..!'



एक "दे" बोलगाणे

थेंब थेंब मुरू दे
माती मधे जिरू दे
बी त्यात रुजू दे
कोंब त्याला येऊ दे
कोंब असा वाढू दे
पान त्याला फुटू दे
माझ्या उंची येव्हढी
फांदी त्याची वाढू दे
फांदी फांदी नटू दे
फुलांनी हसू दे
थोडी फूलं देवाला
थोडी मला मिळू दे





# मामाचा गाव

मामाचा गाव
खूप खूप दूर
जाण्याची तिथे
लागे हुरहूर


गावाच्या कडेला
मळ्याची वाट
मळ्याच्या वाटेला
झाडी घनदाट
झाडावर पक्ष्यांची
चाले किलबिल
कोकिळा दुरून
घाली गोड शीळ

मामाच्या मुलांशी
खेळायला जाऊ
मामीच्या हातची
पुरणपोळी खाऊ
मामाही देईल
संत्र्याची फोड
आंबट बोरे पण
लागतील गोड.........

उद्धव भयवाळ

हत्ती

एकदा एका हत्तीला
झाली खूप सर्दी
डॉक्टरांनी त्याच्याभवती
केली खूप गर्दी
आजारी तो हत्ती जेव्हा
शिंकू लागला सटासट
डॉक्टर सारे दूर जाऊन
पळू लागले पटापट
एकदा एका हत्तीला
अशक्तता वाटली
डॉक्टरांना म्हणे,
"द्या टानिकची बाटली"





बालहट्ट श्रीरामाचा..



बालहट्ट श्रीरामाचा
चंद्रासवे खेळण्याचा

दुरूनी नको पाहणे
चंद्र हेच हवे खेळणे

कसा हट्ट पुरवावा
जवळी चंद्र कसा यावा

श्रीरामास काही पटेना
कौशल्यामातेस कळेना



घेतले श्रीरामास कडेवरी
दाविले बिंब सरोवरी

पाण्यात चंद्रबिंब पाहिले
बालमुखी हास्य पसरले

रजनी अरणकल्ले ..

## बाळासाठी.......



एक दाणा चिऊसाठी
एक घरटे काऊसाठी

एक घास हम्मासाठी
एक वाटी माऊसाठी

एक बिस्किट भू भू साठी
एक अंगाई चांदोबासाठी

एक गाणे बाळासाठी
गोड गोड पापीसाठी

## पोपटराव पोपटराव

हिरवी शाल, लाल चोच
गळ्याभोती काळा गोफ
कसले भारी दिस्ता राव
पोपटराव पोपटराव
मिरच्या खाता तिखटजाळ
पेरुबरोबर ओली डाळ
शिट्ट्या बडबड किती किती
झोके घेता दांडीवरती
आवाजाची मस्त नक्कल
कुठून एवढी आणली अक्कल


बसवराज बिराजदार

bsbirajdarsir@gmail.com




# चांदोबाची गमाडी - गम्मत !

चांदोबाची गमाडी - गम्मत !

चांदोमामा गोलम गोल
गोल गोल ढोल मटोल

केला आईकडे हट्ट खूप
कमी झाले साखरतूप

साखरतूप कमी झाले
चांदोबा बिचारे रडू लागले

रडता रडता मुळुमुळु
चांदोबा वाळले हळुहळु

रुसुन चांदोबा दडून बसले
कोणालाही नाही दिसले

आईने पुन्हा देता खाऊ
चांदोबा हसून लागले डोकाउ

हसतात कसे ओठातून
चंद्रकोर दिसते उठून !

बसवराज बिराजदार

bsbirajdarsir@gmail.com)



वाघाची मावशी....



वाघाची मावशी मनीमाऊ छोटीशी
सिप सिप करताच उडी मारी इवलीशी

शांपूबिंपू काही नको तरी किती छान
चाटत बसते स्वतःला आवडेना घाण

म्याँव म्याँव करत घोटाळते पायात
लाड करुन घेते मावशी ही तोऱ्यात

टॉमी समोर येताच गुरकते केवढी
केस फुलवून म्हणते मी तर तुझ्याएवढी...

बसवराज बिराजदार

bsbirajdarsir@gmail.com)



# बनीची गोष्ट




"म्याऽऽव"

"म्याव म्याऽऽव"

"बाळांनो इकडे या बघू पटकन" मनीने तिच्या पिल्लांना साद घातली आणि आईची हाक ऐकून बनी,हनी, गुंड्या, राणी,सोनी,मोनी दुडू दुडू धावत तिच्यापाशी आले.

बाळं दूध पिण्यात गर्क झाली आणि मनी त्यांना चाटून तिचं प्रेम व्यक्त करण्यात गर्क झाली.

"बाळांनो, हे घर सोडून दुसरी कडे जायची वेळ झालेय हं आता. तेव्हा उगाच मस्ती करून मला त्रास द्यायचा नाही. "बी" विंग मधे एक टिव्हीचा खोका पडलाय ना ती जागा मी आपल्या नवीन घरासाठी नक्की केलेय. एकेकाला तोंडात धरून मी तिथे नेणार आहे. माझ्या मागे उगाच धावत यायचं नाही. अजून तेव्हढे मोठे झाला नाहीत तुम्ही की एकटे इकडे तिकडे काही अडचण न येता स्वत:ला सांभाळत जाऊ शकाल"

"काय कळ्ळं का बनुटल्या मी काय म्हणाले ते?" मनीने मधेच मस्तीखोर बनीच्या टपलीत पंजाने हलकेच मारत विचारलं.

बनीने उत्तरादाखल नुसतच डोकं मनीच्या पोटावर घासलं.

"हम्म! म्हणजे ऐकलच नाहीस तू, मी इतका वेळ काय सांगत होते ते" मनीने त्याच्या डोक्यावर कुरवाळात लाडीक रागाने म्हंटलं.

बनी,हनी, गुंड्या, राणी,सोनी,मोनी सहा भावंडं पण प्रत्येकाचे स्वभाव वेगळे. हनी एकदम भित्री भागुबाई, राणी दिसायला एकदम गोंडस आणि वागायला एकदम आदर्श बाळ, सोनी आणि मोनी एकमेकांशीच जास्त मस्ती करण्यात दंग असलेली जोडी, गुंड्या एकदम गुंड, इतरांना घाबरवयला जाणारा तर बनी म्हणजे उचापती नंबर वन. बनीला कायम वाटे आपण गुंड्या सारखं धाडसी व्हावं, राणी सारखं गोंडस दिसावं, आणि असं काहीतरी करावं की आई आपल्यावर एकदम खुश होईल. तिला आपला अभिमान वाटेल. तसा बनी होता चांगला पण हा उचापती स्वभाव आणि रुसून बसण्याची सवय ह्यामुळे जरा मनीचा ओरडा खायचा इतकच.

बाकीच्यांची कमी पण मनीला बनी आणि हनीची कायम काळजी वाटायची. एक मुलखाची भित्री तर दुसरा एक नंबर उचापती. बरं! गुंड्या सारखा टग्याही नाही की केली उचापत तर सहीसलामत बाहेर पडेल त्यातून.

"संध्याकाळी उन्हं उतरली की जाऊया आपण, आत्ता आराम करा थोडा. मी ही आराम करते थोडावेळ." असं म्हणत मनीने जिन्याखालच्या तिच्या घरात चांगली ताणून दिली.

बनी, हनी, मनी, सोना, गुंड्या, राणी सगळे थोडावेळ तिथेच तिच्या अंगावरून उड्या मारत खेळत राहीले. मग तिने रागावून पंजा उगारल्यावर त्यांनीही तिच्या पोटापाशी जागा करून झोप काढायचं ठरवलं. तेव्हढ्यातल्या तेव्हढ्यात बनी आणि गुंड्याचं झोपायच्या जागेवरून काहीतरी भांडण झालं आणि बघता बघता ते गुर्र गुर्र ह्या नेहमीच्या लाडीक भांडणावरून पंजा पंजीच्या मुष्टीयुद्धावर गेलं.

आवाज वाढला आणि हे गुरकावणं कानावर जाऊन मनीची झोपमोड झाली तशी ती वैतागली आणि डोळे मिटून हवेतच पंजा फिरवत त्यांना ओरडली. नेमकं तिच्या जवळ त्यावेळी बनीची पाठ असल्याने तिचा पंजा त्याला लागला आणि गुंड्या सकट सगळ्यांनीच त्याला "आईचा मार" मिळाला म्हणून चिडवून घेतलं.

झालं बनीला रुसून बसायला निमित्तच मिळालं. "हा मी निघालो" म्हणत पडला जिन्या खालच्या खोलीतून बाहेर. हे तसं नेहमीचच होतं म्हणून कोणी त्याला थांबवलं नाही की मनीला उठवलं नाही. नेहमीच तो रुसून "ए" विंग मधल्या तळमजल्यावरच्या घराच्या गॅलरीत जाऊन बसायचा. ही गॅलरी त्यांचं पहिलं घर होतं. मग तिथे एक जण रहायला येणार म्हणून घर मालकाने घर साफ केलं तेव्हा ह्यांचीही तिथून उचलबांगडी झाली. खरतर त्या घरमालकाला त्यांना इमारती बाहेरच घालवायचं होतं पण त्यांच्या छोट्या मुलीने हट्ट केला म्हणून त्यांना ही जिन्याखालची जागा मिळाली. हे घर

होतं तसं चांगलं पण "मांजरांच्या राज्यातल्या" नियमांनुसार पिल्लं लहान असताना अशा सात जागा बदलायच्या असतात. त्या नियमाला धरूनच मनीने ते घर सोडून "बी" विंग मधे मागच्या बाजूला पडलेल्या टिव्हीच्या खोक्यात नवीन घर करायचा निर्णय घेतला होता.

तर ती हे जिन्याखालचं घर झोपून उठल्यावर सोडणारच होती पण तापुर्वीच ह्या बनी आणि गुंड्याची मारामारी झाली, त्यात बनीला मार मिळाला असं चिडवून सगळ्यांनी बनीच्या रागात भर घातली आणि बनी घराबाहेर पडला.

त्याची पावलं नेहमीप्रमाणे गॅलरीच्या घराकडे वळली, पण तो अर्ध्या वाटेत तसाच थांबला.

"सगळे मला तिथेच जाणार शोधायला. आज मी सगळ्यांना धडा शिकवेन. मला हसतात काय?" असा विचार करून बनी दोन क्षण तिथेच थबकला. कुठे जावं ह्याचा विचार करताना त्याच्या डोक्यात एकदम एक योजना आली. त्याने ठरवलं सगळ्यांच्या आधी त्या "बी" विंग मधल्या "टिव्ही च्या खोक्यातल्या" घरी जाऊन बसायचं. कितीही दमलो, वेळ लागला तरी चालेल, पण तिथेच जायचं. सगळे पहिले गॅलरीत शोधतील. तिथे नाही दिसलो तर इकडे तिकडे शोधतील. पण कोणाला कळणारच नाही की ह्या टिव्हीच्या खोक्यामधे येऊन बघावं. मग जेव्हा आई त्यांना आधी इथे आणून

ठेवेल तेव्हा सगळ्यांनाच आश्चर्य वाटेल. गुंड्याच्या आधी मी येईन आणि मग त्याला मस्त ठेंगा दाखवेन.

मनात विचार आल्याक्षणी तो "बी" विंग कडे उड्या मारत जाऊ लागला. "ए" विंग ला वळसा घालून तो इमारतीच्या दुसऱ्या भागात आला देखील.
"आता बस अजून थोडं चाललं, अजून थोडी शोधाशोध केली की मग मला घर दिसेल" असं स्वत:शीच म्हणत त्याने पुढचं पाऊल टाकलं आणि तिथेच उभा राहिला. पायापाशी एक सावली दिसली म्हणून मान वर करून बघीतलं तर वरच्या मजल्यावर रहाणारा गोट्या उभा होता.

बनी घाबरला. अर्थात त्याला कारणही तसच होतं. हा गोट्या सगळ्यानाच त्रास द्यायचा. इमारतीतल्या लहान मुलांपासून ते प्राण्यांपर्यंत सगळ्यांनाच त्रास द्यायचा. अगदी फुलपाखरांना आणि चतूरांना पण पकडून त्रास द्यायचा.

पुढ्यात उभ्या असलेल्या बनीला बघून त्याला एकदम खुनशी आनंद झाल्याचं बनीला त्याच्या चेहऱ्यावरून लग्गेच कळलं. खाली वाकून गोट्या त्याला उचलणार इतक्यात चपळाईने बनी वळला आणि जीव खाऊन धावत सुटला.

त्याच्या मागे "ए कुठे जातो, ए थांब" असं म्हणत येणाऱ्या गोट्याला बघून बनीने त्याचा वेग वाढवला. सोसायटीच्या फाटकाला

असलेल्या फटीमधून एकदम बाहेर उडी मारून बनी रस्त्यावर कधी आला त्यालाही कळलं नाही. जीवाच्या भीतीने धावत एकदम रस्त्यावर आला तेव्हा त्याला जाणिव झाली ह्या गोष्टीची. मागे वळून बघीतलं तर गोट्या फाटका पाशीच उभा दिसल्याने मागे जाणं तर शक्यच नव्हतं ,तेव्हा तो तसाच पुढे धावत गेला आणि गोट्या दिसेनासा होईपर्यंत धावतच राहिला. पण ह्या नादात तो इमारती पासून खूप दूर आला. परत जाण्याचा मार्ग काही त्याला सुचेना तेव्हा एकदम भांबावून गेला. त्यात इकडून तिकडे आणि तिकडू इकडे भरधाव जाणाऱ्या रिक्षा, बाईक्स, बस ह्यामधे तो गोंधळून तसाच उभा राहिला. नेमकं एक रिक्षा चुकवायला गेला आणि धडपडून पडला. पडला तोच एका सायकल वाल्याच्या सायकल समोर आला. सायकलस्वार पण अचानक आलेल्या बनीमुळे गोंधळला आणि त्याचा तोल गेला.

बिच्चारा बनी! त्याला चांगलाच अपघात झाला. जीव वाचला पण पाय काही उचलता येईना त्याला.

आता मात्र बनीला आईची, हनीची, सोनू, राणी, मोनी सगळ्यांचीच आठवण येऊन रडू यायला लागलं. सायकल स्वाराने आधी सायकल बाजूला करून बनीला हळूवार उचलून घेतलं. स्वत:बरोबर त्याला स्वत:च्या घरी नेऊन जखमेवर हळदीचा लेप लावला. दूध प्यायला दिलं.

संध्याकाळ झाली तरी बनी काही पायावर उभा राहू शकत नव्हता, हे बघून त्या सायकलस्वाराने त्याला एका बास्केट मधे ठेवलं आणि मित्राला सोबत घेऊन त्याने प्राण्यांचा दवाखाना गाठला.

डॉक्टरांनी पायाच्या जखमेला औषध लावलं आणि जबरदस्तीने तोंड उघडून एक कसलं तरी कडू चवीचं औषध तोंडात घातलं. जाताना बरोबर काही औषधं आणि जखमेवर लावायला एक पावडर पण दिली कसलीशी.

सुरूवातीला त्याला ह्या सायकलस्वाराचा खूप राग यायचा. त्याला वाटायचं एका गोट्याच्या तावडीतून सुटून दुसऱ्या गोट्याच्या तावडीत सापडलो आहोत आपण.

पण थोड्याच दिवसात त्याला कळून चुकलं की हा सायकलस्वार गोट्यासारखा दुष्ट अजिबात नाही आहे. तो जे करतोय ते आपण बरं व्हावं म्हणून करतोय.

मग मात्र बनी त्याला सहकार्य करू लागला. रोज दूधाचा खुराक खाऊन, पेडीग्रीचे दाणे खाऊन, औषध घेऊन आणि सायकलस्वाराच्या प्रेमळ सहवासाने बनी लवकरच ठणठणीत बरा झाला.

एकीकडे त्याला आनंद होत होता पण दुसरी कडे त्याला त्याच्या आईची, बहिण भावांची आठवण येऊन वाईट वाटायचे. विशेषत: आईला किती वाईट वाटत असेल हे जाणवून रडू यायचे. पण

एकट्याने परत जाऊन त्याचं घर ज्या इमारतीत होतं तिचा शोध घेणं त्याच्या अवाक्या बाहेरचं होतं. तो रस्ता, त्या रस्त्यावरचं वडाचं झाड, त्या झाडाच्या बुंध्याशी असलेली एका कुठल्याश्या देवाची तसबीर, त्या तसबीरी भोवती लावलेली अगरबत्ती, झाडाच्या मागे असलेलं रसाचं गुऱ्हाळ आणि त्या गुऱ्हाळाच्या तोंडाशी असलेलं उंदराचं बीळ, ह्या आणि अशा बऱ्याच गोष्टी त्याला आईच्या बोलण्यातून ऐकून पाठ झाल्या होत्या. पण तिथपर्यंत जायचा रस्ता मात्र आठवत नव्हता.

त्या दिवशी त्याच्या नव्या दोस्ताने म्हणजे सायकलस्वाराने त्याला अंघोळ घातली, अंघोळ हा एकच प्रकार त्याला अजिबात आवडत नसे. त्याने नाईलाजाने घालून घेतली अंघोळ. मग त्याला कोरडं करून ते दोघे सायकल वरून भटकायला निघाले. त्याच्यासाठी त्याच्या दोस्ताने स्पेशल बास्केट लावून घेतली होती सायकल वर. तिच्यात बसून आजुबाजूला बघत फिरायला बनीला खूप आवडायचं.

"आज आपली दोस्ती होऊन बरोब्बर एक महीना झाला मित्रा" सायकल स्वार त्याला थोपटत म्हणाला. आजचा दिवस आपला मैत्रीदिन, म्हणून तुला अंघोळ घालून आज इथे आणलय जिथे आपण पहिल्यांदा भेटलेलो. बघ आठवतेय का ही जागा?" सायकलस्वाराने थोपटत म्हंटलं तसं बनीने आजुबाजूला जरा जास्तच निरखून बघीतलं.

त्याचा अपघात झाला तिच ही जागा, हे थोडा ताण दिल्यावर त्याच्या लक्षात आलं.

म्हणजे घरही इथून जवळच असणार असं त्याला वाटून गेलं.

"माझ्या मित्रा, मला माहिती आहे तुला तुझ्या घरच्यांची आठवण येते. मी बघतो ना इतर मांजरी जेव्हा त्यांच्या पिल्लांना चाटतात तेव्हा तू लांबूनच ते बघत हरवून जातोस. म्हणून तर आणलं तुला इथे आज. आता तू बरा झालायस पूर्ण पणे. आता शोधूयात तुझं घर" सायकल स्वाराने बनीच्या केसातून हात फिरवत म्हंटलं.

बनीला त्याच्या आणि त्याला बनीच्या भाषेतले शब्द न शब्द कळत नसले तरी स्पर्शाची भाषा बरोब्बर कळायची.

बनीने हळूच त्याच्या हातातून उडी मारली आणि मग बनी पुढे आणि त्याचा दोस्त त्याच्या मागे मागे अशी त्यांची जोडगोळी बनीचं घर शोधत निघाली.

ओळखीच्या खुणा शोधता शोधता एकदाचं ते वडाचं झाड त्याच्या खालची तसबीर, अगरबत्ती, उसाचं गुऱ्हाळ ह्या सगळ्या खुणा पटल्या आणि बनीने एकदम आनंदाने "म्याव" केलं. मग झपाझप दोघेही त्या इमारतीपाशी पोहोचले. फाटकातून आत, मग "ए" विंग पाशी, मग "बी"विंग पाशी असं सगळीकडे गेले. जिन्याखाली तर कोणीच नव्हतं, टिव्हीचा खोकाही नव्हता बी विंगच्या मागे. आता कुठे

शोधायचं असा विचार करत असतानाच त्यांना बारिकशी "म्याव म्याव" ऐकू आली आणि त्या दिशेने धावायला बनीने सुरूवात केली. त्याच्या मागून त्याचा दोस्त धावत होता. सोसायटी मधल्या बागेतल्या पपईच्या झाडाच्या मागे सोनी आणि मोनी खेळत होते. बनीने त्यांना साद घातली. बनीला बघून दोघांनाही खूप आनंद झाला. तिघांनी एकमेकांच्या अंगावर उड्या मारून आनंद साजरा केला. मग तिघेही नवीन घराकडे निघाले. पण जाण्यापूर्वी आपल्या दोस्ताशी ओळख करून द्यायला तो विसरला नाही आणि दर मैत्रीदिनी ते इथेच भेटणार ह्या वचनाची आठवण द्यायलाही तो विसरला नाही.

कविता नवरे

---



## पाहुणचार..!!

एक हत्ती डोंगराएवढा भला मोठा.
डोंगरावर एक झाड, विस्तिर्ण,
पाना फुलांनी बहरलेलं. त्यावर अनेक घरटी.
एक घरटं चिऊताईचं. डोंगरालगत एक जंगल घनदाट. तेथे हत्तीच वास्तव्य.
रोज सकाळी हत्ती डुलत डुलत डोंगराजवळ येत असे. रोज सकाळी चिऊताई घरट्यातून बाहेर येत असे.वर आकाशात एक गोल गिरकी घेऊन हळुच जमिनीवर ऊतरुन दाणे टिपत असे. दोन दाणे चोचीत घेऊन पुन्हा ऊडत ऊडत घरट्याशी येऊन पिलांना दाणा भरवत असे. दिवसभर चिऊताईचे असे आकाशात ऊडणे, जमिनीवरुन दाणा टिपणे व घरट्याशी जाऊन बसणे, हत्ती पहात असे. त्या घरट्यातील पिले त्याला दिसत नव्हती. घरट्याशी चिऊ काय करते..सारखे दाणे का गोळा करते..हे हत्तीला जाणुन घ्यायची ईच्छा झाली. एक दिवस त्याने सोंड वर करुन चिऊताईला हाक मारली. चिव चिव करत चिमणी जवळ आली. जवळच्याच झाडाच्या एका फांदीवर बसली. हत्तीने विचारले.. चिऊताईने सांगितले.
हत्तीला ईवल्याशा चिऊताईची ईवलीशी पिले पहायची ईच्छा झाली.
तुझ्या घरट्यात येतो ग, तुझी पिले पहातो ग..हत्ती म्हणाला.
चिऊताई घाबरी घुबरी! छोटस घरटं त्यात हत्ती कसा मावेल..?चिऊताई हवालदिल!

हत्ती दादा डोंगरावर थोडा वर चढ, पाय ऊंच करुन घरट्यात पहा, माझी पिले दिसतील तुला. हत्तीने तसे केले..पण पिले काही दिसली नाहीत. घरटं मात्र जवळुन पाहिलं. त्याला ते घरटं खुप आवडल. ईवल्या छोट्या घरट्यात चिऊताई आपल्या बाळांसह कशी रहात असेल बरे..हत्तीची ऊत्सुकता वाढली. घरट्यात जाण्याचा हट्ट केला. चिऊताईने समजाऊन सांगितले की घरटे लहान तु महान, मावणार नाहीस ईथे. पण त्याने ऐकले नाही.अजुन वर चढून आला. अगदी घरट्याशी आला. मान वर करून सोंड ऊंचाऊन घरट्यात पहाणार..तेवढ्यात सोंडेचा धक्का लागुन घरटे कलंडले. त्यातली पिले खाली पडणार तेवढ्यात आजुबाजुच्या ईतर पक्षांनी पिलांना सावरले. कावळ्यांनी एकच गलका केला, हत्ती निघुन गेला. मग सगळ्यांनी ते घरटं नीट सरळ केल.



चिऊताईचा जीव भांड्यात पडला!

हत्ती जंगलात गेला. चिऊताईच्या घरट्याला काय झाले हे त्याला कळलेच नाही. पण कावळ्यांनी गलका करुन आपल्या हाकलल्याचे त्याला वाईट वाटले होते. मित्रांनी विचारले..चिऊताईचा पाहुणचार

घेतलास का? तिने काय दिले?..हत्ती आधीच रागावलेला, रुसलेला, चिडलेला होता. चिऊताईने एक घासभर सुद्धा काही खायला दिले नव्हते, तर ऊलट घरट्याजवळ पोचताच पिलांना पंखात लपवत होती..! त्याला त्या चिऊताईचा भारी राग आला.

दुसऱ्या दिवशी तो चिऊताईला रागाऊन म्हणाला..साधा पाहुणचार करता आला नाही तुला..? घासभर खाऊसुद्धा दिला नाहिस..? मी पाहू नये म्हणून पिले पंखात लपवत होतीस..असली कसली ग तू गृहिणी, चिऊताई..!

चिऊताई अचंभित! तीला रडु फुटु लागले काय बोलावे कळेचना..! झाडावरचे सगळे पक्षी हे ऐकत-पहात होते. सगळे जवळच्या झाडाच्या फांदीवर गोळा झाले. झाला प्रकार हत्तीला समजाऊन सांगीतला. हत्तीच्या साध्या स्पर्शानेसुद्धा घरटे कसे हालते व मोडू शकते हे सांगितले. हत्तीचा घास म्हणजे चिऊताईचे वर्षभराचे धान्य होईल..! हत्तीला पटले. मग पुन्हा दोघांची मैत्री पूर्विप्रमाणे चालू राहिली..!     तात्पर्य- यजमानाच्या जीवावर बेतेल अश्या पाहुणचाराची अपेक्षा पाहुण्याने करु नये.



## एक बोध कथा (संग्रहित)

एकदा एका देवळात एक प्रवचन चालू होते. अनेक बोधकथा सांगत प्रवचनकार लोकांना गुंगवून ठेवण्यात पारंगत असल्याने खूप गर्दी होत असे त्यांच्या प्रवचनांना. गर्दीचे एक कारण आणखीन असे होते कि, बुवा प्रवचन संपल्यावर भक्ताचे शंका-निरसन देखील करत असत.एक दिवस असेच प्रवचन संपल्यावर बुवांनी नेहेमीच्या प्रथे प्रमाणे म्हणाले, 'तुमची कुणाची काही शंका असेल तर मोकळेपणानी विचारा'. त्यावर अत्यंत त्रासिक चेहऱ्याचा एक माणूस उभा राहिला, कपाळभर आठ्यांचे जाळे असलेला हा माणूस म्हणाला, "तुमच्या प्रवचनात तुम्ही तुकोबारायांचे 'मन करा रे प्रसन्न' हे फार चांगल्या रीतीने समजावून सांगितलेत. पण आयुष्यातील चिंतांचे, ताण-तणावांचे आम्ही काय करायचे? ते कृपा करून सांगा."यावर थोडे अंतर्मुख होत बुवा म्हणाले, 'सांगतो, थांबा जरा, बसा आपण' असे म्हणून त्यांनी आपल्या शिष्याला

म्हणाले, 'अरे, माझ्या साठी एक भांडभर पिण्याचे पाणी आण बरे
प्यायला.'
शिष्यांनी पाणी आणले. ते भांडे हातात धरून सर्वांना दाखवत
बुवांनी एक
प्रश्न विचारला, 'मंडळी, किती वजन असेल बरे या भांड्याचे?''पन्नास
ग्रॅम', 'शंभर ग्रॅम', 'दीडशे ग्रॅम' अशी विविध उत्तरे श्रोतृवार्गातून
आली. 'या भांड्याचे वजन नेमकं किती आहे, मलाही ठाऊक नाही.
पण समजा हे
भांडे मी हातात धरून ठेवले २-३ मिनिटांसाठी तर काय
होईल?''काहीच नाही'
एका श्रोत्याने उत्तर दिले.'बरं, एक तास भर धरून ठेवले तर काय
होईल?''तुमचा हात दुखायला सुरवात होईल, बुवा!''बरं, दिवसभर मी
हे भांडे
असेच धरून ठेवले तर काय होईल हो?''तुमच्या हाताला मुंग्या येऊ
लागतील,
कदाचित हात लुळा पडेल तुमचा, किंवा कदाचित तुम्हाला
रुग्णालयात भरती
करावे लागेल!''छान! अगदी बरोबर! आता मला असं सांगा, कि या
दरम्यान या
भांड्याचे वजन अपोआप वाढले कां हो?''छे! मुळीच नाही, असे कसे
होईल?'यावर
प्रसन्न हसत बुवा म्हणाले, 'आपल्या आयुष्यातील विवंचनांचे, ताण-
तणावांचे

देखील असेच असते. त्यांच्या बद्दल थोडा वेळ विचार केला तर फार काही बिघडत
नाही. थोडा जास्त वेळ विचार केला तर कदाचित डोके दुखायला लागेल. आणि सतत
त्यांचाच विचार करू लागलात तर तुम्ही लुळे-पांगळे व्हाल किंवा तुम्हाला
वेड्याच्या इस्पितळात दाखल करावे लागेल.' 'लक्षात येतंय कां मी काय
म्हणतोय ते? म्हणून, तुमच्या चिंतांचे भांडे अधून मधून खाली ठेवत जा.
विसरा त्यांना आणि निर्धास्त रहा. भगवंत बघतोय ना सगळं!!!' "मग म्हणा,
विठ्ठल...विठ्ठल...विठ्ठल...विठ्ठल..."

---

---



# गणपती बाप्पा more द्या

दरवर्षी प्रमाणे घरात गणपतीत उत्साहाचे वातावरण होते. आईने व ताईने घराची छान साफसफाई केली . बाबा पेपर वाचत बसले होते तोच आईने त्यांना कामाला लावले .
'सोफ्यावर खूप धूळ साचली आहे , मला मेलीला तो व्ह्याक्युम चालवता येत नाही ना ,नाहीतर कशाला ....'
बाबांचा चेहरा त्रासिक झाला पण छोटा राजू बघतोय हे पाहिल्यावर लगेच खोटा खोटा उत्साह दाखवीत बाबा उठले ,तरी राजू ने वाक्य पूर्ण केलेच,
'नाहीतर कशाला तुमच्या पाया पडले असते'

दादा रंगीत कागदाची आरास बनवीत होता,मधेच ,'राजू, बघ हे थर्मोकोल चे चक्र फिरते का बघ ' म्हटल्यावर राजूने बटरी घालून ,बटन ऑन करून चक्र फिरवून पहिले. खरे तर दादा हे करू शकला असता
पण तो जर राजू ला प्रमोट करत होत.
'दादा ,डेकोरेशन भारी झालाय हं ' ताई मस्का मारत होती .
'आता स्कॉलर राजू कुठल्या विचारात पडला आहे' ताई ने विचारले
'ताई,आपल्याला गणपती इको फ्रेंडली करायचना ,मग थर्मोकोल का वापरतोय आपण ' इति राजू
'दादा ओवर तो यू ' ताईने पळवाट काढली .

हेच हेच बघायचे होते ,तुझ्या लक्षात येते का नाही , पास झालास हा राजू , ठरले पुढच्या वर्षी थर्मोकोल कटपी ' दादा म्हणाला

इको फ्रेंडली इको फ्रेंडली म्हणून राजू ने घरात सगळ्यांचे डोके खाल्ले होते, म्हणून गणपती प्लास्टर ऑफ परीसचा ना आणता ,शाडू मातीचाच आणला होता आणि तो हि एका वर्कशॉप ला जाऊन ताईने हाताने बनविला होत. दिसत होता थोडा ओबडधोबड पण तरीही राजू खुश होता त्यात आजी आजोबा आले म्हणून आणखी खुश .

'यावर्षी तरी आरत्या पाठ करा रे' .ते बाबांकडे पाहत म्हनले. इतकी वर्षे झाली तरी बाबा आरतीचे पुस्तक पाहत आरत्या पुटपूटत . 'चांगले खणखणीत आवाजात म्हणारे' आजी म्हणाली

'बाबा मोरया म्हणजे काय' राजू पिडायला लागला
गणपतीची आरती कुणी रचली माहिती आहे का ? बाबांनी सेफ झोन मध्ये यायचा प्रयत्न केला .
'माहित्ये,रामदासांनी .दास रामाचा वाट पाहे मध्ये नाही का त्यांनी सिघ्नेचर ठेवलीय, पण मोरया का म्हणायचे ?' राजू
'दादा सांगून टाक रे त्याला ' बाबांनी टोलवला
' हं ,बघतोय,विकिपीडिया मध्ये पण हा राजुपिडीया जर सवड देईल तर ना ,किती पिडतोय' दादा मोबाइल मध्ये पाहत म्हनाला .

व्हाय मोरया ? राजू सोडत नव्हता ,आजी मध्ये पडली अरे मोठी माणसं सांगताहेत ना, मग म्हणायचे ,अरे हा श्रद्धेचा विषय आहे .
'बर का राजू , अरे मोरया गोसावी म्हणून मोठे सिद्धपुरुष होऊन गेले चिंचवडला ,ते मोठे गणेश भक्त होते, म्हणून मोरया बर का ' आजोबा म्हणाले
'या या समथिंग तसेच काहीतरी दिलेलं आहे नेट वर' दादा म्हणाला

ओके अग्री , ते ग्रेट होते पण मग रामदास स्वामी पण ग्रेट होते त्यांनी आरती पण रचली ,ते भारतभर फिरले, बलोपासना केली ' राजू द स्कॉलर
'मग काय ' बाबा म्हणाले
'मग ,गणपती बाप्पा स्वामी का नाही ?'राजू

नाही ,चांगले आहे ,नवविचार चांगले आहे आजोबा इकडेतिकडे पाहत म्हणाले
पण आपल्या सर्वांनाच आता मोरया ची सवय झाली ना ,त्याला हे rhyming नाहीये ,आजोबांनी नवा मुद्दा काढला .

तेवढ्यात टीव्ही वर 'दिल मांगे मोर 'ची जाहिरात लागली , म्यूट करा रे बाबा ओरडले , ८०% जाहिरात आणि २० % प्रोग्राम असे झालंय टीव्हीचे ,वैतागून बाबा म्हनले.

'मोर द्या कसं वाटतंय ' राजू उत्साहाने म्हणाला .
काय ते , दादाची ट्यूब पेटली नाही .

'छान आहे , गणपती बाप्पा मोर या ' ताई म्हणाली .

काय चाललय , आरतीची तयारी झालीय ,लवकर चला , गुरुजी पण आलेत .

मग होऊन जाऊदे , आजोबा म्हणाले, 'नाहीतरी ईश्वराकडे आपण मागत असतोच, मग त्यात कंजुषी कशाला ?'

'बोला , गणपती बाप्पा '

गगनभेदी आवाजात सर्व मंडळी ओरडली,"more या "




विडंबन काव्य

पाटी नाही फुटली
शाळा सुटली ! मी धुम ठोकली
!
पळता पळता धडक झाली
हातची पाटी उडून पडली
अरेच्चा हे काय फुटलीच नाही
पण ते तर म्हणतात

शाळा सुटली पाटी फुटली
शाळा सुटली पाटी फुटली

सांग ना आइ काय जादू झाली
पाटी माझी फुटलीच नाही
अरे बाळा पाटी आता
हुशार झाली
अशी तशी फुटतच नाही
सोडून तुला जाणार नाही
पहिल्या सारखी जड नाही
अरे व्वा ! ही तर माझ्या
सारखीच
धमाल धूडगूस मज्जा मस्ती
मी तर आता भिणारच नाही

सुटली रे सुटली शाळा सुटली
पाटी नाही फुटली पाटी नाही
फुटली !
मंगेश....! ९८८१४९०१४७



श्रावणी मिलिंद मेढी इयत्ता ९ वी



# इथे झाला बॉम्ब स्फोट

-तनया देवळे

इयत्ता ९ वी

[डोंबिवली]

तर तिथे झाली दंगल
नाही जगवले प्राणी पक्षी
कापले सारे जंगल
पसरतोय आतंकवाद
हा झाला आहे दुर्दम्य
नाही राहिली अवनी आता
पूर्वी सारखी रम्य
गरीब होतात अजुन गरीब
तर श्रीमंत, आणखी श्रीमंत
ह्या समाजाला लागलेल्या
किडीमुळे
लुप्त झाले पुरातन ग्रंथ
दाही दिशांमध्ये पसरला
दहशत-अंधःकार
लोकांमध्ये वाढलाय स्वार्थ
आणि अहंकार
ह्या सगळ्यात किती जीव
लागले पणाला....
मी म्हणते, असे झाले तरी काय
ह्या जगाला???



तुमचे लिखाण आम्हाला balnetakshari@gmail.com

ह्या पत्यावर जरुर पाठवावे.

